आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७ .०० वाजता
२० मे २०२५ - मंगळवार

ठळक बातम्या

- राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणाला मंत्रिमंडळाची मान्यता, दोन लाख कोटी रूपये गुंतवणूक आणि दीड लाखापेक्षा जास्त रोजगार संधी आणणाऱ्या प्रकल्पांना मंजुरी

- राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी घेतली मंत्रिपदाची शपथ

- गडचिरोली इथं पाच जहाल महिला नक्षलवादी पोलिसांच्या ताब्यात

- अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर श्रीनिवासन यांचं निधन

आणि

- ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर कालवश

<><><><><>

“माझं घर - माझे अधिकार” हे ब्रीदवाक्य असलेल्या, "राज्य गृहनिर्माण धोरण २०२५" ला राज्य मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या गृहनिर्माण धोरणात ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी, औद्योगिक कामगार, पत्रकार, दिव्यांग, माजी सैनिक या सर्वांच्या घरांचा विचार केला असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. राज्य शासनानं २०३० पर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न गटांसाठी ३५ लाख घरं उभारण्याचं उद्दिष्ट ठेवले असून, सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक घटकासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत. निवासी वापरासाठी योग्य असलेल्या शासकीय जमिनींची एक बँक निर्माण केली जाईल. वॉक टू वर्क,

म्हणजे कामाच्या ठिकाणाजवळ घरं असावीत या संकल्पनेच्या अनुषंगानं या धोरणात रोजगार केंद्रांच्या जवळ, विशेषतः औद्योगिक क्षेत्रांमधल्या घरांच्या विकासावर भर दिला आहे, असं ते म्हणाले. हे धोरण ग्रीन बिल्डिंग पद्धतींना प्रोत्साहन देणारे आहे. पर्यावरणपूरक पायाभूत सुविधांच्या एकत्रीकरणाला प्रोत्साहन देत शहरांचं अधिक हरितीकरण करण्यावर भर दिला आहे, असं शिंदे यांनी सांगितलं.

उद्योग विभागातल्या, धोरण कालावधी संपल्यामुळे प्रलंबित असलेल्या ३२५ प्रस्तावांनाही मंत्रिमंडळानं या बैठकीत मंजुरी दिली. यामुळे सुमारे १ लाख ६५६ कोटी रूपयांची गुंतवणूक, आणि ९३ हजार ३१७ रोजगार निर्मिती होणं अपेक्षित आहे.

फॅब प्रकल्पाकरता प्रोत्साहन धोरणाअंतर्गत ३१३ प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. त्यातून सुमारे ४२ हजार ९२६ कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित असून ४३ हजार २४२ रोजगार निर्मिती होणार आहे.

अवकाश आणि संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरणानुसार १० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. त्यातून ५६ हजार ७३० कोटी रूपयांची गुंतवणूक, आणि १५ हजार ७५ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

रायगड जिल्ह्यातल्या पोशीर धरण प्रकल्पाला ६ हजार ३९४ कोटी आणि शिलार प्रकल्पासाठी ४ हजार ८६९ कोटी, धुळे जिल्ह्यातल्या सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेसाठी ५ हजार ३२९ कोटी, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात अरुणा प्रकल्पांतर्गत मौजे हेत जल सिंचन प्रकल्पाला २ हजार २५ कोटी रुपयांच्या खर्चाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पदाची शपथ दिली. मुंबईत राजभवन इथं

झालेल्या या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपस्थित होते.

<><><><><><>

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या वतीने आयोजित दोन दिवसीय स्टार्टअप कॉन्क्लेव्हला आजपासून मुंबईत सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन झालं. कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. या परिषदेत ८०० पेक्षा जास्त प्रतिनिधी, वैज्ञानिक, ७० पेक्षा जास्त स्टार्टअप्स, औद्योगिक भागीदार, गुंतवणूकदार, शैक्षणिक संस्था आणि सरकारी यंत्रणांचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

<><><><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

बुलढाणा शहरातही आज तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यातल्या खामगाव इथं कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या नेतृत्वात तिरंगा यात्रा काढण्यात आली.

तिरंगा यात्रेबद्दल मुंबईतल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकू या...

होल्ड.... बाईट

<><><><><><>

अनेक हिंसक कारवायांमधे सहभागी असलेल्या पाच महिला नक्षलवाद्यांना पोलीस आणि केंद्रीय राखीव दलाच्या जवानांनी आज गडचिरोली इथून ताब्यात घेतलं. यातल्या तिघींना अटक करण्यात आली असून दोघी अल्पवयीन असल्यानं त्यांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात येणार आहे. या नक्षलवाद्यांवर एकूण ३६ लाख रुपयांचं इनाम होतं. उंगी मंगरू होयाम उर्फ सुमली, पल्लवी केसा

मिडियम उर्फ बंडी आणि देवे कोसा पोडियाम उर्फ सविता अशी अटक केलेल्या नक्षलवाद्यांची नावं आहेत. त्यांच्याकडून तीन एसएलआर रायफल, एक ३०३ रायफल, दोन भरमार बंदुका जप्त करण्यात आल्या आहेत.

<><><><><><>

प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉक्टर एम आर श्रीनिवासन यांचं आज तामिळनाडूमधे निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. डॉक्टर श्रीनिवासन यांना भारताच्या नागरी अणुऊर्जा कार्यक्रमाचे शिल्पकार म्हणून ओळखलं जातं. अणुऊर्जा विभागात सप्टेंबर १९५५ ला त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. भारताची पहिली अणुभट्टी अप्सरा च्या निर्मितीत डॉक्टर होमी भाभा यांच्यासोबत श्रीनिवासन यांचा सहभाग होता. देशातल्या महत्त्वाच्या ऊर्जा प्रकल्पांच्या निर्मितीत त्यांचं मोठं योगदान होतं. श्रीनिवासन यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी श्रीनिवासन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><><>

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ आणि विज्ञान साहित्यिक जयंत नारळीकर यांचं आज पहाटे पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण तसंच पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरवलं होतं. ब्रिटनमधल्या केंब्रिज इथून डॉक्टरेट आणि रॅंग्लर या प्रतिष्ठित पदव्या घेतल्यानंतर त्यांनी १९७२ मध्ये मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्थेत खगोलशास्त्र विभाग प्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली. फ्रेड हॉयल यांच्यासह त्यांनी मांडलेला हॉयल-नारळीकर सिद्धांत प्रसिद्ध आहे. पुण्यात आयुका या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा प्रमुख सहभाग होता. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन

रुजवण्यासाठी 'पोस्टकार्डाद्वारे विज्ञान' सारख्या अभिनव कल्पना त्यांनी राबवल्या. विज्ञानकथांबरोबरच त्यांनी विज्ञानावर विपुल लिखाण केलं. त्यांच्या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी नारळीकर यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मन की बात या कार्यक्रमाद्वारे येत्या रविवारी जनतेशी संवाद साधणार आहेत.

श्रोते या कार्यक्रमासाठी त्यांच्या सूचना १ ८ ० ० १ १ ७ ८ ० ० या टोल फ्री क्रमांकावर पाठवू शकतात. नरेंद्र मोदी ॲप आणि माय गव्ह ॲपद्वारेही आपल्या सूचना २३ मे पर्यंत पाठवता येतील.

<><><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ८७३ अंकाची घसरण झाली आणि तो ८१ हजार १८६ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २६२ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ६८४ अंकांवर बंद झाला.

जागतिक व्यापारातली अनिश्चितता आणि नफावसुलीवरचा गुंतवणूकदारांचा भर, यामुळे ही घसरण झाल्याचं बाजार विश्लेषकांनी सांगितलं.

<><><><><><>

राज्यात अनेक ठिकाणी कालपासून पावसाने हजेरी लावली.

रत्नागिरी जिल्ह्यात आज बऱ्याचशा ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस पडायला सुरवात झाली. पावसाची संततधार अजून सुरुच आहे. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या कुडाळ, वेंगुर्ले, सावंतवाडी, कणकवली, वैभववाडी या तालुक्यात सर्वत्र जोरदार पाऊस कोसळला.

कोल्हापूर जिल्ह्यात आज दुपारी हलक्या स्वरुपाचा तर संध्याकाळी जोरदार पाऊस झाला. **जालना** शहरासह जिल्ह्यातल्या बहुतांश भागात आज दुपारी चार वाजता वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. **सांगली** जिल्ह्यातही मिरज, कवठेमहांकाळ, खानापूर, पलूस आणि तासगाव तालुक्यात मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडत आहे.

<><><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या भागात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

<><><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या भागात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><><>//